# सीसीटीएनएस प्रणालीत नांदेड जिल्ह्याची उत्कृष्ट कामगिरी

## जिल्हा पोलीस दलाने मिळवले राज्यात प्रथम स्थान

**नांदेड-** सीसीटीएनएस प्रणालीत जिल्हा पोलीस दलाची कारकीर्द नेहमीच चर्चेत राहिली आहे. दरम्यान नुकत्याच लागलेल्या सीसीटीएनएस रँकिंगमध्ये नांदेड जिल्हा पोलीस दलाने राज्यात प्रथम स्थान पटकावले आहे. यामुळे संपुर्ण राज्यात नांदेड जिल्ह्याची मान पुन्हा एकदा उंचावली आहे.

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून पोलीस घटकांच्या सीसीटीएनएस कामगिरीबाबतचा आढावा दर महिन्यात घेण्यात येतो, राज्यातील सर्व घटकांचे माहे मार्च २०२३ मधील सीसीटीएनएस मासिक कामगिरी अहवालांचे अवलोकन करुन देण्यात आलेल्या गुणांकनानुसार नांदेड जिल्हयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये नांदेड जिल्ह्यातील ३६ पोलीस स्टेशन येथे दाखल होणारे प्रथमखबर, घटनास्थळ पंचनामे आरोपी अटक, मालमत्ता जप्ती, दोषारोप पत्र न्यायालयीन निकाल, हरवलेले इसम अनोळखी मयत, अदखलपात्र खबर, गहाळ, बेवारस मालमत्ता, प्रतिबधक कारवाई व ईतर नोंदी अशा एकुण १८ प्रकारच्या माहितीची सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये वेळेत परिपुर्ण नोंदी करण्यात येतात. तसेच सीसीटीएनएस प्रणालीचा दैनंदिन कामकाजात वापर करुन गुन्हे प्रतिबंध गुन्हे उघडकीस आणून चांगली कामगिरी करण्यात आली. तसेच आयटीएसएसओ, आयसीजेएस, सीआरआय-मॅक व सिटीजन पोर्टल वरील ई-कॉप्लीमेंट, वेळेत निर्गती व प्रभावीपणे वापर केल्याने माहे मार्च २०२३ मध्ये नांदेड जिल्हयाने ३४२ गुणांपैकी ३३७ गुण मिळवून महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक आला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीएनएस नोडल अधिकारी अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, डॉ. खंडेराय धरणे व त्यांची सीसीटीएनएस टीमच्या परिश्रमामुळे नांदेड पोलीस दलाने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्यासाठी पोलीस अधिक्षक यांनी सीसीटीएनएस विभागाचे कौतुक केले आहे. तसेच भविष्यातही अशाच कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# सीसीटीएनएस प्रणालीत नांदेड जिल्ह्याची उत्कृष्ट कामगिरी

## जिल्हा पोलीस दलाने मिळवले राज्यात प्रथम स्थान

**नांदेड-** सीसीटीएनएस प्रणालीत जिल्हा पोलीस दलाची कारकीर्द नेहमीच चर्चेत राहिली आहे. दरम्यान नुकत्याच लागलेल्या सीसीटीएनएस रँकिंगमध्ये नांदेड जिल्हा पोलीस दलाने राज्यात प्रथम स्थान पटकावले आहे. यामुळे संपुर्ण राज्यात नांदेड जिल्ह्याची मान पुन्हा एकदा उंचावली आहे.

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून पोलीस घटकांच्या सीसीटीएनएस कामगिरीबाबतचा आढावा दर महिन्यात घेण्यात येतो, राज्यातील सर्व घटकांचे माहे मार्च २०२३ मधील सीसीटीएनएस मासिक कामगिरी अहवालांचे अवलोकन करुन देण्यात आलेल्या गुणांकनानुसार नांदेड जिल्हयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये नांदेड जिल्ह्यातील ३६ पोलीस स्टेशन येथे दाखल होणारे प्रथमखबर, घटनास्थळ पंचनामे आरोपी अटक, मालमत्ता जप्ती, दोषारोप पत्र न्यायालयीन निकाल, हरवलेले इसम अनोळखी मयत, अदखलपात्र खबर, गहाळ, बेवारस मालमत्ता, प्रतिबंधक कारवाई व ईतर नोंदी अशा एकुण १८ प्रकारच्या माहितीची सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये वेळेत परिपुर्ण नोंदी करण्यात येतात. तसेच सीसीटीएनएस प्रणालीचा दैनंदिन कामकाजात वापर करुन गुन्हे प्रतिबंध गुन्हे उघडकीस आणून चांगली कामगिरी करण्यात आली. तसेच आयटीएसएसओ, आयसीजेएस, सीआरआय-मॅक व सिटीजन पोर्टल वरील ई-कॉप्लीमेंट, वेळेत निर्गती व प्रभावीपणे वापर केल्याने माहे मार्च २०२३ मध्ये नांदेड जिल्हयाने ३४२ गुणांपैकी ३३७ गुण मिळवून महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक आला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीएनएस नोडल अधिकारी अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, डॉ. खंडेराय धरणे व त्यांची सीसीटीएनएस टीमच्या परिश्रमामुळे नांदेड पोलीस दलाने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्यासाठी पोलीस अधिक्षक यांनी सीसीटीएनएस विभागाचे कौतुक केले आहे. तसेच भविष्यातही अशाच कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली आहे.